# राष्ट्रीय प्रजनन आरोग्य संशोधन संस्था परळ, मुंबई
(भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद) व
# बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
यांचा संयुक्त उपक्रम

***" लैंगिक संबंधातून पसरणारे संसर्ग व गर्भाशयमुखाचा कर्करोग याविषयी मुंबई शहरातील झोपडपट्ट्यामधील जोडप्यांचे ज्ञान वाढविण्याच्या व आरोग्य सेवा प्राप्त करण्यासंबंधित वर्तनाचा विकास करण्याच्या दृष्टिने करण्यात येणारा अभ्यास "***

## गर्भाशयमुखाचा कर्करोग

गर्भाशयमुखाचा कर्करोग हा भारतीय स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळणारा आजार आहे. यामध्ये गर्भाशयमुखाच्या पेशी कर्करोगाने ग्रासल्या जातात. गर्भाशयमुख म्हणजे योनीमार्गातून दिसणारा गर्भाशयाचा सुरूवातीचा एक भाग. दरवर्षी सुमारे १,२५,००० स्त्रियांना गर्भाशयमुखाचा कर्करोग होतो आणि ५०,००० पेक्षा अधिक स्त्रिया या आजारामुळे मृत्युमुखी पडतात. या आजाराचे निदान प्राथमिक अवस्थेत झाले तर हा आजार पुर्णपणे बरा होऊ शकतो. या पत्रकाचा उद्देश गर्भाशयमुखाच्या कर्करोगाविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हा आहे.

***गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची लक्षणे***

प्राथमिक अवस्थेत गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची कोणतीच लक्षणे दिसत नाहीत. स्त्रियांमध्ये सामान्यत: ३५ वर्षे वय व त्यानंतर खालील कोणतीही लक्षणे गर्भाशयमुखाचा कर्करोग सुचित करू शकतात.

- दोन मासिक पाळी दरम्यान योनीमार्गातून रक्तस्त्राव
- प्रत्येक लैंगिक संबंधानंतर रक्तस्त्राव
- मासिक पाळी बंद झाल्यानंतर (रजोनिवृत्तिपश्चात्) योनिमार्गातून होणारा रक्तस्त्राव
- अनियमित मासिक पाळी आणि योनीमार्गातून असामान्य अतिरक्तस्त्राव
- असाधारण थकवा, अशक्तपणा, वजनात घट

कर्करोगाची लक्षणे दिसण्यापूर्वी सोप्या तपासणीद्वारे (पॅप स्मिअर) पूर्वप्राथमिक अवस्थेतील गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे निदान करणे शक्य आहे. वर नमूद केलेली कोणतीही लक्षणे आढळल्यास आपल्या डॉक्टरांकडून त्वरीत वैद्यकीय तपासणी करून घ्यावी.

***पॅप स्मिअर चाचणी म्हणजे काय?***

कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराची लक्षणे सुरूवातीला दिसत नाहीत तसेच काही लैंगिक आजारांचीही लक्षणे सुरूवातीच्या काळात दिसत नाहीत. परंतू पॅप स्मिअर या चाचणीमुळे प्राथमिक अवस्थेतच या आजारांचे निदान करता येते. पॅप स्मिअर चाचणीमुळे कर्करोग व कर्करोगाच्या प्राथमिक अवस्थेतील बदल तसेच जंतुसंसर्गामुळे होणाऱ्या लैंगिक आजाराचे निदान करता येते. लग्न झालेल्या १८ ते ४५ या वयोगटातील प्रत्येक स्त्रीने ही तपासणी निदान दोन वर्षातून एकदा तरी करवून घेणे गरजेचे आहे.

***पॅप स्मिअर चाचणी कशी करतात?***

पॅप स्मिअर ही चाचणी सोपी व वेदनारहित आहे. कापसाच्या किंवा ब्रशच्या सहाय्याने स्त्रीच्या योनी मार्गातून गर्भाशयमुखावरील स्त्राव घेऊन तो काचपट्टीवर पसरविला जातो. प्रयोगशाळेमध्ये यावर विशेष रासायनिक प्रक्रिया करून सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे परिक्षण केले जाते. ही एक सहज करता येणारी चाचणी आहे. ऑपरेशन नाही. ही चाचणी करताना स्त्रियांना काहीही त्रास होत नाही व या चाचणीकरीता फक्त तीन मिनीटे एवढाच कालावधी लागतो. मासिक पाळीच्या दिवसांव्यतिरिक्त ही चाचणी केव्हाही करता येते.

*पॅप स्मिअर चाचणीचे फायदे*

- नियमित पॅप स्मिअर चाचणी करून घेतल्याने कर्करोगाच्या प्राथमिक लक्षणांचे निदान होऊन त्यामुळे होणारा त्रास व अकाली येणारा मृत्यू टाळता येतो.
- पॅप स्मिअर चाचणीमुळे लैंगिक आजाराचे निदानही करता येत असल्यामुळे त्यावर त्वरित उपचार करून भविष्यात होणारे गंभीर परिणाम टाळता येतात.

*गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची संभाव्य कारणे*

- लहान वयात लैंगिक संबंध
- लहान वयात मुलीचा विवाह
- वयाच्या २० वर्षाअगोदर पहिली गर्भधारणा
- तीनपेक्षा अधिक वेळा गर्भधारणा किंवा दोन गर्भधारणांमध्ये कमी अंतर (यामुळे गर्भाशयमुखाला वारंवार इजा होते व ती जखम भरण्यास अवधी मिळत नाही)
- एकापेक्षा अधिक पुरूषांशी किंवा एका पुरूषाचे अनेक स्त्रियांशी असलेले लैंगिक संबंध
- गुप्तागांची अस्वच्छता
- गुप्तरोग, विशेषत: एच्.पी.व्ही. (ह्युमन पॅपीलोमा व्हायरस्) चा जंतुसंसर्ग

वरील नमूद केलेल्या कारणांचा प्रतिबंध होऊ शकतो. परंतु अज्ञान, अस्वच्छता व जागरूकतेचा अभाव अशा कारणांमुळे गर्भाशयमुखाच्या कर्करोगामुळे अनेक स्त्रिया मृत्युमुखी पडतात.

*गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचा धोका टाळण्यासाठी..........*

- वय वर्ष ३० नंतर पॅप स्मिअर चाचणी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.
- लग्नाचे वय १८ वर्षांपेक्षा अधिक असावे. त्यामुळे पहिल्या लैंगिक संबंधालाही पुढे ढकलता येईल.
- कुटुंब नियोजनाच्या साधनांचा उपयोग करून पहिल्या मुलाचा जन्म हा वयाच्या २० वर्षानंतर होईल याची खबरदारी घ्यावी.
- दोन मुलांमध्ये अंतर ठेवण्याकरीता कुटुंब नियोजन साधनांचा वापर करा.
- वारंवार आणि तीन पेक्षा अधिक गर्भधारणा टाळा.
- गुप्तरोगांपासून सुरक्षा मिळण्याकरीता लैंगिक संबंधाच्या वेळी निरोधचा वापर करा.
- योनीमार्ग व जननेंद्रियांची स्वच्छता राखा तसेच जोडीदाराच्या गुप्तांगाची स्वच्छता असणेही महत्त्वाचे आहे.
- जीवनशैलीत काही बदल, उदाहरणार्थ :-

  अल्पवयीन लैंगिक संबंध टाळणे

  एकापेक्षा अधिक व्यक्तिंशी लैंगिक संबंध टाळणे

*गर्भाशयमुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्याकरिता आपण काय करू शकता?*

आपल्याला मिळालेली माहिती आपण दुसऱ्याला सांगू शकता. कर्करोगामुळे उद्भवणारे दु:ख, यातना व मृत्यू यापासून ही माहिती आपल्याला दूर ठेवू शकते. लवकरात लवकर निदान आणि उपचार यामुळे गर्भाशयमुखाचा कर्करोग आटोक्यात आणता येतो.

राष्ट्रीय प्रजनन आरोग्य संशोधन संस्था आणि बृहन्मुंबई महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रसुतिगृह, टागोर नगर नंबर-७, विक्रोळी (पूर्व) येथे प्रत्येक महिन्याच्या चौथ्या गुरूवारी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेस पॅप स्मिअर परिक्षण शिबिर आयोजित करण्यात येते. या दिवशी ही तपासणी मोफत करण्यात येते. सर्व महिलांनी या शिबिराचा लाभ अवश्य घ्यावा. आपण सुध्दा आपल्या परिवारातील लग्न झालेल्या सर्व महिलांची पॅप स्मिअर तपासणी जरूर करून घ्या आणि कर्करोगापासून दूर रहा.